Introdⁿ to cross-cultural psy.

classmate
Date Sem-V
Page Paper-VIII

# 1. आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्राची ओळख

## 1.1. charles Darwin and the age-old search for cultural universals - चार्लस् डार्विन आणि सांस्कृतिक सार्वत्रिकतेचा दीर्घकालीन शोध

पृथ्वीवर कोठेही राहणाऱ्यांची यादृच्छिक निवड थांबवा आणि त्यांचे योग्य प्रमाण घेतल्यास जॉन लेननने जगण्यासाठी काय केले, महात्मा गांधी शांततावादी होते आणि चार्लस् डार्विनने उत्क्रांती बाबतचे प्रसिद्ध पुस्तक लिहिले हे सांगता येणे शक्य होईल. एक छोटासा भाग तुम्हाला on the origin of species मधील मुख्य युक्तीवादापर्यंत घेऊन जाऊ शकतो. डार्विनच्या इतर पुस्तकांची नावे काहीजण सांगू शकतात. जेव्हा डार्विन The Expression of the emotions in man and Animals (1872) हे संशोधन करीत होता. तेव्हा त्याने अनेक प्रश्न उपस्थित केले. जे आजही मानसशास्त्रज्ञांमध्ये व्यापून राहीले आहेत. या प्रश्नांवरुन असे दिसते की डार्विन हा फक्त जीवशास्त्रज्ञ आणि नैसर्गिक इतिहासकार नव्हता तर तो एक मानवी मनाचा अभ्यास करणारा विद्यार्थी होता. हे 1850 मध्ये घडले होते. म्हणजे लिपझिंग विद्यापीठात मानसिक जीवनाच्या अभ्यास करणारी पहिली प्रयोगशाळा निर्माण होण्याच्या अगोदर 20 वर्षे होय.

भावनिक अभिव्यक्तीची सार्वत्रिकता या प्रश्नामध्ये डार्विनचा रस होता. स्कॉटस् आणि इजिप्शीयन लोकांचे चेहरे आनंद, राग आणि गोंधळ व्यक्त करताना सारखे दिसतात याचे आश्चर्य डार्विनला वाटत होते. उदा. हसणे, तोंडाचे स्नायू ताणले जाणे, दात खाण्याची विकृती याचा अर्थ जगभरात सारखाच असेल का? जर असेल तर, त्याचे कारण म्हणजे भावनिक अभिव्यक्ती ही शारीरिक प्रतिक्रिया आहे. आणि संस्कार / संगोपनाचा विचार न करता ती सार्वत्रिकपणे मानवाकडून व्यक्त होते. जर दुसऱ्या बाजूला, जकार्ता आणि केंटुकीमध्ये भोउणाऱ्या अर्थ वेगळा असेल तर भावनिक अभिव्यक्ती ही शिकलेली प्रतिक्रिया

classmate
Date
Page

आहे आणि ती सांस्कृतिक पार्श्वभूमीने निश्चित होते. संशोधनाचा हा मुद्दा आपल्याला ओळखता येतो. तो म्हणजे 'आनुवंशिकता - परिस्थिती वाद' [nature-nurture debate] (आपल्या वर्तनामध्ये जैविक आनुवंशिकता [nature] आणि परिस्थितीच्या प्रभाव [nurture] यापैकी कोणता अधिक प्रभावी याबाबतचा वाद)

20 व्या शतकात जेव्हा मानसशास्त्र प्रत्यक्षात कृतीशील झाले तेव्हा मानवी वर्तन आणि मानसिक कार्याच्या विविध पैलूंमधील सांस्कृतिक सार्वत्रिकता या डार्विनच्या प्रश्नासारखे प्रश्न प्रमुख विषय बनले. मानसशास्त्र जागतिक संदर्भामध्ये ठेवण्यात विशेष रस असणारी मानसशास्त्राची शाखा म्हणजे 'जागतिक मानसशास्त्र' [Global psychology] होय. या शाखेमधील संशोधन करण्यासाठी मानवी सार्वत्रिकतेचा शोध घेणे हा मुख्य विषय बनला. उदा. 1972 मध्ये Deregowski ने विचारले चित्रातील तीन मितींचे संवेदन विविध संस्कृतीत समान/सारखे होते का? 1966 मध्ये Piaget ने विचारले - विविध संस्कृतीतील मुलांचा वैचारीक विकास सारख्या प्रमाणात होतो का? 21 व्या शतकातदेखील सार्वत्रिकतेचा शोध सुरुच आहे. उदा., Van de Vliert (2006) ने विचारले - व्यवस्थापकांमधील हुकुमशाही (निरंकुश) नेतृत्वशैली जगभरातील विविध देशात आणि वातावरणात सारखीच प्रभावी असते का? असे अनेक प्रश्न सांस्कृतिक सार्वत्रिकतेच्या संशोधनामध्ये दिसून येतात.

## 1.2 Introducing cross-cultural psychology - आंतरसांस्कृतिक मानसशास्त्राची ओळख.

वर्तन आणि अनुभवाचा सांस्कृतिक सार्वत्रिकता हा पैलू असून सर्व सांस्कृतिक संदर्भात सारखा आहे. उदा., Deregowski [1972] याचा संस्कृतीच्या प्रभावाशिवाय सर्व मानवामध्ये चित्राच्या तीन मितींचे

संवेदन सारखे करण्याची क्षमता असते का? यामध्ये रस होता. असे प्रश्न शोधण्यासाठी तुम्हाला लॅपटॉप, कॅमेरा आणि वह्या इ. घेऊन विविध सांस्कृतिक ठिकाणी स्थलांतर करण्याची आहे. पण सांस्कृतिक सार्वत्रिकतेच्या शोध घेणे म्हणजे संशोधन करण्यासाठी विशिष्ट ठिकाणी (क्षेत्रावर) फक्त फिरणे नाही. जर तुम्ही सार्वत्रिक मानसशास्त्रीय बाबींचा विचार करत असाल तर तुम्हाला जागतिक मानसशास्त्राबाबत काही गृहीतके बनवावी लागतील आणि ती कशी वापरावी हेही पहावे लागेल. ही गृहीतके जागतिक संशोधन दृष्टिकोनाला आधार देतात. जो आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्र म्हणून ओळखला जातो.

"आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्र ही जागतिक मानसशास्त्राची एक शाखा असून यामध्ये विविध संस्कृतीतील लोकांच्या वर्तन आणि अनुभवाची तुलना करून त्यांच्या मानसशास्त्रीय कार्यात्मकतेवरील संस्कृतीचा प्रभाव किती हे समजून घेतले जाते." दुसऱ्या शब्दात, आंतरसांस्कृतिक मानसशास्त्रज्ञ वर्तन आणि अनुभवाचे कोणते पैलू सर्व मानवी संस्कृतीत सारखे आहेत आणि कोणते पैलू निश्चित ठिकाणी एकमेव आहेत हे शोधण्याचा प्रयत्न करतात. आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्र हा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात जागतिक मानसशास्त्रज्ञांकडून अनुकूल मानला गेला असून हा फक्त दृष्टिकोन नाही हे आपण शिकणार आहोत. आंतर-सांस्कृतिक संशोधनातील सांस्कृतिक सार्वत्रिकतेला दोन मुख्य गृहीतके आधार देतात - ① सैद्धांतिक ② पद्धतीशीर

गृहीतक - 1 : मानसिक ऐक्य -

आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्राच्या सांस्कृतिक सार्वत्रिकतेच्या शोधामध्ये (Shewder, 1991) मुख्य गृहीतक 'मानसिक ऐक्य' हे आहेत. दैनंदीन जीवनात या संज्ञेचा अर्थ म्हणजे मानवी विविधता बाह्य पेहरावामध्ये असूनही

फक्त वरवरची आहे. अधिक तांत्रिकदृष्ट्या. या संज्ञेचा अर्थ म्हणजे मानसशास्त्रीय कार्यात्मकतेमधील कोणताही फरक (व्यक्तीमत्व गुण, संवेदन आणि स्मृती-च्याचणी-वरील निष्पादन इ.) आणि सामाजिक वर्तन [प्रियाराधन, अभिवृत्ती, मूल्ये, आज्ञाधारक पातळी] हे संस्कृतीच्या पलीकडे जाऊन काही सार्वत्रिक मानसशास्त्रीय क्षमतांनी मर्यादित केले आहे. म्हणून जर Mozambique मुले welsh मुलांपेक्षा गोष्टीमधील तपशील अधिक बरोबर लक्षात ठेवत असतील तर तो 'स्थानिक फरक' [local difference] मानला जाईल. याचा अर्थ असा नव्हे की, त्यांची गोष्टी लक्षात ठेवण्याची आणि सांगण्याची मानसशास्त्रीय क्षमता एकमेकांपेक्षा भिन्न आहे.

मानसिक ऐक्य या गृहीतकानुसार, जेव्हा संशोधक भिन्न सांस्कृतिक संदर्भात भिन्न वर्तनाचा अहवाल देतात. तेव्हा हे स्थानिक फरक वास्तविक आव्हानात्मक नसतात. कारण सर्व मानवामध्ये अंतर्गत, जागतिक मन / शुद्ध अस्तित्व, दिग्दर्शक विचार आणि कृती असतात. [shewder, 1991]. थोडक्यात, मानसिक ऐक्य ठामपणे सांगते की, आपल्या सांस्कृतिक भिन्नतेमध्ये ही मानसिक रचनांचा [मन, स्मृती, क्षमता, संवेदन प्रक्रिया] एक संच असून तो सर्व मानवांमध्ये विभागला आहे. मानसिक ऐक्याचे गृहीतक, मानवी मन एका बाजूला आणि बाह्य जगातील वर्तन दुसऱ्या बाजूला यांच्यातील दुरचा सहसंबंध वर्णन करतो.

मन किंवा मानसशास्त्रीय क्षमता या अंतर्गत, सार्वत्रिक, संस्कृतीचा प्रभाव नसणाऱ्या अशा पाहिल्या आहेत. दरम्यान बाह्य जगातील वर्तन हे बहिर्गत, भिन्न आणि संस्कृतीचा प्रभाव असणारे असे पाहिले आहे. यावरून तुम्ही म्हणू शकता की, आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्रज्ञांचे काम हे आहे की, आपले वर्तन

classmate
Date
Page

मानसिक ऐक्याच्या [सार्वत्रिकता] प्रभावाखाली किती आहे आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या [भिन्नता] प्रभावाखाली किती आहे याचा शोध घेणे.

गृहीतक-2 :- सांस्कृतिक समानता.

आंतर-सांस्कृतिक संशोधनाचे वर्णन 'तत्सम प्रयोग' असे केले जाऊ शकते. मानसशास्त्रातील प्रायोगिक पद्धतीची ती एक नक्कल आहे. स्वतंत्र परिवर्त्याच्या आधारे प्रयुक्तांना दोन परिस्थितीमध्ये ठेवून अन्यथा समतुल्य परिस्थितीत ठेवून चाचणी घेतल्यास त्यांच्या वर्तनाच्या कोणत्या पैलूवर स्वतंत्र परिवर्त्याचा प्रभाव पडतो हे शोधणे. थोडक्यात, जर प्रयुक्त दोन परिस्थितीत भिन्न वागले तर हा स्वतंत्र परिवर्त्याचा प्रभाव असल्याचे गृहीत धरता येते. आंतर-सांस्कृतिक संशोधन हे याचे अनुकरण करते. यामध्ये स्वतंत्र परिवर्तक संस्कृती असते.

भिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या प्रयुक्तांची एका निवडक मानसशास्त्रीय क्षमतेवर तुलना केली जाते. उदा., Zambian प्रौढांची South African प्रौढांशी साध्या रेखाकृती चित्रातील तीन मितींच्या संवेदन क्षमतेबाबत तुलना केली जाऊ शकते. स्वतंत्र परिवर्तक सोडून [सांस्कृतिक पार्श्वभूमी] इतर सर्व परिवर्तके स्थिर ठेवली जातात. हा सांस्कृतिक समानतेचा मुख्य भाग आहे म्हणून संशोधनामध्ये दोन / अधिक समूह समतुल्य पद्धतीने अभ्यासासाठी घेतले जातात आणि हे प्रयुक्त समतुल्य लोकसंख्येमधून घेतले जातात, त्यांच्यात फक्त सांस्कृतिक पार्श्वभूमीचा फरक असतो. ही आंतर-सांस्कृतिक संशोधनाद्वारे ~~घेतली~~ वापरली जाणारी मुलभूत संशोधन परिस्थिती आहे ज्याद्वारे सांस्कृतिक सार्वत्रिकतेच्या शक्यतेचा शोध घेतला जातो. संशोधनाचा हा एकमेव प्रकार नसून, आंतर-सांस्कृतिकतेच्या अभ्यासासाठी वापरला जाणारा अधिक लोकप्रिय प्रकार आहे.

येथे दोन प्रकारची समानता अंतर्भूत आहे. एक म्हणजे, प्रयुक्त समतुल्य चाचणी परिस्थितीमध्ये ठेवले जातात. आणि दुसरे म्हणजे हे प्रयुक्त समतुल्य लोकसंख्येमधून (उदा., वय, लिंग, उत्पन्न, साक्षरता आणि संख्या पातळी) तसेच त्यांच्या स्वतःच्या संस्कृतीमधून [व्याख्या - असा समूह ज्यामध्ये विश्वास, मते, परंपरा आणि वर्तनाचे मानदंड भिन्न असतात.] निवडले जातात. याचा अर्थ असा की, Japanese Graduates स्त्रियांची तुलना Israeli undergraduates पुरुषांशी करणे अशी परिस्थिती टाळणे होय. जर सांस्कृतिक समानता या दोन मार्गांनी संपादीत केली तर अभ्यासामधील समूह फक्त सांस्कृतिक पार्श्वभूमीमध्ये भिन्न राहतील. म्हणून समूह निष्पादनातील कोणताही फरक हा सांस्कृतिक भिन्नतेमुळे झाला असल्याचे विश्वासाने सांगता येईल. तसेच जर निष्पादनामध्ये कमी फरक असल्यास किंवा कोणताही फरक झाला नसल्यास सांस्कृतिक सार्वत्रिकता असल्याचे अधिक विश्वासाने सांगता येईल. जर भिन्न संस्कृतीतील प्रयुक्तांनी चित्राचे तीन मितीमध्ये सारखेच संवेदन झाल्यास त्रिमिती चित्राचे संवेदन क्षमता सर्वांमध्ये असल्याचे म्हणता येईल.

## 1.3 Later trends : cross-cultural psychology or cultural psychology ?

## नंतरचे कल : आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्र किंवा सांस्कृतिक मानसशास्त्र

20 व्या शतकाच्या शेवटी मानसशास्त्र आणि मानववंशशास्त्र त्यांच्या वेगळ्या मार्गाने जाऊ लागले आणि मानसशास्त्रीय मानववंशशास्त्राची पसंती कमी झाली. मानसशास्त्राचा अभ्यास संस्कृतीच्या पलीकडे वाढला आणि विविध दिशेने व अनेक मार्गांनी विकसित झाला. यातील आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्र हा मार्ग

अधिक उत्सुकपणे अभ्यास झाला. 1960 आणि 1970 च्या दशकात आंतर-सांस्कृतिक दृष्टिकोनातून लिहिलेली पुस्तके आणि लेख प्रकाशित झाले. यामध्ये आंतर-सांस्कृतिक मापनातील समस्येची चर्चा एक माहितीपुस्तिका अंतर्भूत होती. [Biesheuvel, 1969].

बोधनिक आणि वैकासिक मानसशास्त्र क्षेत्रातील आता 'अभिजात आंतर-सांस्कृतिक अभ्यास' समजले जाणारे अनेक अभ्यास याच काळात केले होते. हा काळ आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्राच्या वाढत्या संख्यात्मक स्वीकृतीचा होता. कारण याच काळात अनेक आंतर-सांस्कृतिक जर्नल्स आणि संघटनांची निर्मिती झाली.

उदा.) 1966 - IJC - International Journal of psychology
1970 - JCCP - Journal of cross-cultural psychology
1972 - IACCP - International Association for cross-cultural psycho.
1984 - ARIC - Association pour la recherche interculturelle

मानसशास्त्राच्या मुख्य प्रवाहात पूर्णतः स्वीकृतीसाठी आंतर-सांस्कृतिक दृष्टिकोनाला अजून कार्य करणे आवश्यक आहे. अनेक मानसशास्त्राच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमामध्ये यांचे स्थान परिघावर [कमी महत्वाचे] आहे. कारण यांचा भर वर्तनावरील सांस्कृतिक प्रभाव अभ्यासण्यावर असल्याने सार्वत्रिक मानसशास्त्रीय कायदे निर्मितीसाठी धोका दर्शविते. [Jahoda & Krewer, 1997]. 1970 च्या दशकात संस्कृतीच्या प्रभावामध्ये रस असणाऱ्या काही संशोधकांनी मानवी सार्वत्रिकतेचा शोध ही आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्राची मुलभूत संकल्पना नाकारण्यास सुरुवात केली.

Cole [1978] यांच्या नेतृत्वात असलेल्या आणि Vygotsky (1978) व Luria (1976) यांच्या प्रभावाखालील संशोधकांच्या गटाने आंतर-सांस्कृतिक मानसशास्त्राच्या मुलभूत कल्पनेचा पुनर्विचार करण्याचे ठरविले.

सांस्कृतिक सार्वत्रिकतेचे अस्तित्व, अंतर्गत गाभाभूत मानसशास्त्रीय रचना [मानसिक ऐक्य] यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांनी मानवी मनाला सार्वत्रिक, अंतर्गत अस्तित्व नसून भिन्न - सांस्कृतिक संदर्भानुसार ते अविभाज्य (वेगळे करता न येणारे) आहे असे प्रतिपादन केले. या दृष्टिकोनानुसार, सांस्कृतिक प्रभावासाठी मन व्यापक आहे आणि आपल्या विकासावरील सर्व जैविक आणि पर्यावरण विषयक प्रभाव हा सांस्कृतिक संदर्भाच्या मध्यस्थीने होतो. थोडक्यात, सर्व मानवी वर्तन संस्कृतीच्या मध्यस्थीने होते. या दृष्टिकोनाचे समर्थन करणाऱ्यांनी मानसशास्त्र आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी नवीन दृष्टिकोन मांडला, त्याला सांस्कृतिक मानसशास्त्र म्हणून ओळखले जाते.

सांस्कृतिक मानसशास्त्रज्ञांसाठी मानवी विकासातील [संपूर्ण इतिहास आणि जीवन - चक्रा दरम्यान] संस्कृतीची भूमिका आंतर - सांस्कृतिक मानसशास्त्रज्ञांपेक्षा अधिक प्रमुख आहे. [Berry et al., 2002] संस्कृती पलीकडील मानसशास्त्राचा हा छोटा इतिहास त्याच्या युरोपियन उगमावर लक्ष केंद्रीत करतो, जेव्हापासून अनुभवजन्य मानसशास्त्राची सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय मानसशास्त्रज्ञ संघटनांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने, 20 व्या शतकापर्यंत मानसशास्त्रज्ञ एक जागतिक उपक्रम बनला आहे [stevens & Gielen, 2007]. या संघटनांच्या निर्मितीमुळे विविध देशातील मानसशास्त्रज्ञांना कल्पनांची / विचारांची देवाणघेवाण, सहकार्याने काम करणे आणि संक्षिप्त रूप तयार करणे यासाठी सशक्त केले.

उदा., 1951 - IUSP - International Union of scientific psycho.
1962 - ICP - International council of psychologists
1965 - IUPsys - International union of psychological science

या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या विकासासोबत, जगाच्या भिन्न भागांमध्ये अनेक मानसशास्त्रीय परंपरांचा उदय नवीन कल म्हणून झाला. ते देशी / स्थानिक मानसशास्त्र म्हणून ओळखले जाते. लॅटिन अमेरिका, आफ्रिका, भारत आणि इतर देशांतील मानसशास्त्रज्ञ, अमेरिकन / युरोपियन मानसशास्त्राच्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देत आहेत आणि ते स्थानिक / देशी दृष्टिकोनातून संशोधन करत आहेत. देशी / स्थानिक मानसशास्त्राची वाढ ही जागतिक मानसशास्त्राच्या क्षेत्रातील एक उत्साहवर्धक सद्यकालीन विकास आहे.

1.4 What do we talk about when we talk about culture?

आपण जेव्हा संस्कृतीबद्दल बोलतो तेव्हा काय बोलतो? - संस्कृती - आपल्या आजूबाजूचे लोक आणि त्यातून निघणाऱ्या गोष्टी (वस्तू, संस्था, श्रद्धा / विश्वास, मते, प्रथा, वर्तनाचे मानदंड यांचा समावेश) [Segall et al., 1990].

मन, सामान्य आणि बोधावस्थेसोबतच संस्कृती हे शब्द मानसशास्त्र शब्दकोशात विवादीत / वादग्रस्त आहेत. खरे म्हणजे संस्कृतीची मान्य होणारी अशी एकच व्याख्या नाही. Segall et al., हे पहिले किंवा शेवटचे नाहीत ज्यांनी संस्कृतीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. आपण सध्याच्या इतरही व्याख्या पाहणार आहोत. पहिल्यांदा आपण संस्कृतीची व्याख्या पाहण्यापेक्षा, संस्कृतीची अधिक समान होण्यासाठी तिचा दैनंदीन जीवनात कसा उपयोग केला जातो हे पाहू.

1. संस्कृती : एक कला - संस्कृती म्हणजे आवडीच्या व स्व-सुधारणेच्या कृतिशीलतेमध्ये (थिएटर, वाचन, नृत्य) भाग घेणे.

2. संस्कृती : संस्कार / मशागत - हे एक जैविकतेशी संबंधित क्रियापद आहे जशी शेतीची मशागत केली जाते तसे व्यक्तीवर संस्कार करणे.

3. संस्कृती : एक जीवनाचा वेगळा मार्ग -

संस्कृती हा शब्द जगण्याचा एक अद्वितीय मार्ग म्हणून वापरला जातो [ यामध्ये अभिवृत्ती, मानदंड, वर्तन, परंपरा यांचा समावेश होतो]. हा मार्ग सामाजिक समूहाकडून share केला जातो त्यामुळे तो समूह इतर समूहापासून भिन्न ठरतो. तसेच तो विशिष्ट ठिकाणाशी संबंधीत असतो. उदा., पाश्चिमात्य संस्कृती, जपानची संस्कृती, भारतीय संस्कृती इ.

वरीलपैकी पहिला मुद्दा Segall et al., च्या व्याख्येवर आच्छादन जातो. तर तिसरा मुद्दा त्यांच्या व्याख्येशी अधिक समान दिसतो.

संस्कृतीच्या एका आणि सर्व व्याख्यांचे लघु-करण करून Berry et al. [2002] यांनी सांगितले की, संस्कृती ही आपल्या जीवनातील सहा क्षेत्रांमध्ये डोकावते. त्यांच्या मते, आपण जेव्हा संस्कृतीबद्दल बोलतो तेव्हा आपण आपल्या सामाजिक समुहाच्या पुढील सहा क्षेत्राबद्दल बोलतो.

① इतिहास आणि परंपरा - मह्य - हिवाळा उत्सव
② रुढी आणि मानदंड - दोन्ही गालावर kiss करून अभिवादन करणे
③ उपक्रम / कृतीशीलता आणि वर्तन - संगीत, नृत्य, खेळ
④ संस्थात्मक आणि संघटनात्मक पायाभूत सुविधा - चर्च आणि राज्य यांचे वेगळेपण
⑤ जैविक वंश - शतकांपूर्वीचे वंशज
⑥ मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये - नम्रता, अभिमान, आणि सहकार्य

संस्कृतीचे वरील सहा संदर्भात मानववंश [ सामायिक ओळख] आणि वंश [ जैविक वंश] या दोन्हीतील घटक समाविष्ट होतात. Triandis (2002) संस्कृतीच्या भौतिक आणि व्यक्तीनिष्ठ घटकांमध्ये असणारा भेद मान्य करतात. संस्कृतीचे भौतिक घटक समूहाची दृश्य आणि सामायिक वैशिष्ट्ये

दर्शवितात. उदा., आपण कपडे कोणती / कशी वापरतो. आपली तंत्रज्ञानाची व्याख्या, आपली आवडती पाककृती इ. याउलट व्यक्तीनिष्ठ संस्कृतीमध्ये अदृश्य, प्रभावित करणाऱ्या कल्पना आणि मूल्ये यांचा समावेश होतो. आणि समूह या गोष्टी पुढील पिढीकडे संक्रमित करण्यास तत्पर असतात [या प्रक्रियेला सांस्कृतिक संक्रमण / प्रसार म्हणतात.] यामध्ये नैतिक तत्वे, धार्मिक शिकवण आणि सामाजिक शिष्टाचार यांचा समावेश होतो. या सुत्रीकरणानुसार, सामाजिक समुहातील [विशिष्ट भागातील किंवा काळातील] अनेक लोक बऱ्याच हे भौतिक आणि संस्कृती म्हणून ओळखली जाते. असा समूह राष्ट्रीय ओळख [Japanese culture], वांशिक ओळख [Latino culture] किंवा विशिष्ट व्यवसाय / आवड [student culture, drug culture] सामायिक करतो किंवा करत नाही.

संस्कृती ही अशी संज्ञा आहे जी लोकांच्या समूहांना वेगळे करते. पण अजूनही इतरही संज्ञा आहेत ज्या या अर्थाने वापरल्या जातात. राष्ट्र (Nation), वांशिकता (Ethnicity) आणि वंश (Race) या सर्व संज्ञा समूहांना वेगळे करतात. अनेकवेळा या संज्ञा अदलाबदल करून वापरल्यामुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो (Matsumoto & Juang, 2004). संस्कृती ही संज्ञा बहु-कार्यात्मक आहे. सामान्य पातळीवर तिचा अर्थ लोकांचे वर्णन किंवा वर्गीकरण असा होतो तर अधिक संकीर्ण पातळीवर तो भिन्न ठिकाणच्या लोकांच्या वर्तनातील फरक स्पष्ट करण्यासाठी वापरली जाते. दीर्घकाळाच्या परंपरेनुसार मानसशास्त्रामध्ये संस्कृती ही वर्णनात्मक आणि स्पष्टीकरणात्मक साधन म्हणून वापरले जाते.

classmate
Date
Page

* संस्कृतीची वैशिष्ट्ये -

① संस्कृती वर्णनात्मक असून एका सामाजिक समूहाला दुसऱ्यापासून वेगळे करते.

② संस्कृती ओळखीचा एक पैलू असून तो राष्ट्रीय, मानववंश आणि वांशिक ओळखीवर आच्छादलेला आहे.

③ संस्कृतीमध्ये भौतिक आणि व्यक्तीनिष्ठ घटकांचा समावेश होतो.

④ संस्कृती स्पष्टीकरणात्मक संज्ञा असून ती भिन्न समूहांच्या वर्तनामधील फरक दर्शविण्यासाठी वापरतात.

⑤ संस्कृतीमध्ये परस्परसंबंध (अन्योन्य) आहे. ती तिच्या सदस्यांकडून उत्पन्न होते आणि त्यांच्यावर प्रभावही पडते.

⑥ संस्कृती ही एका समूहातील सदस्यांकडून दुसऱ्या समूहातील सदस्यांकडे प्रसारीत होते.

1.5 The dynamic process of cultural transmission-
सांस्कृतिक प्रेषणाची [पुढे पाठवण्याची] गतीमान प्रतिक्रिया-

संस्कृती चिरस्थायी कशी राहते? किंवा संस्कृती जिवंत कशी राहते? याचे उत्तर एका शब्दात देता येते. ते म्हणजे 'गतीमान पद्धतीने' कारण अभिवृत्ती, मानदंड आणि वर्तन एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे पाठविले जाते. आणि या प्रक्रियेमध्ये त्यात बदल [किंवा जुळवून घेण्याची प्रक्रिया] होते. उदा., 21 व्या शतकातील युरोपियन लोक 19 व्या शतकातील युरोपियन लोकांसारखे विचार आणि कृती करतात. पण त्यामध्ये अनेक प्रकारची भिन्नतादेखील आहे. संस्कृतीची ही गतीमानता Matsumoto and Juang (2004) यांच्या व्याख्येने समाविष्ट केली आहे. ज्याप्रमाणे सजीवांच्या प्रजाती जैविकदृष्ट्या त्यांच्या पर्यावरणाशी जुळवून घेतात त्याचप्रमाणे संस्कृती तीला गतीमान प्रक्रियेद्वारे चिरस्थायी ठेवते. अनेक लेखक सांस्कृतिक आणि जैविक अनुकुलन ही समांतर प्रक्रिया समजतात. हेच सांगण्याचा प्रयत्न मानवी विकास

आणि भिन्नतेवरील दुहेरी प्रभाव करतो.

Dual influence : cultural & biological adaptation
दुहेरी प्रभाव : सांस्कृतिक आणि जैविक अनुकूलन

दुहेरी प्रभाव प्रतिरूप हे जैविक आणि सांस्कृतिक प्रभाव ही अनुकूलन प्रक्रिया असून ती काही मार्गांनी सारखी तर काही मार्गांनी भिन्न असल्याचे प्रतिपादन करते. वेळ आणि ठिकाणानुसारच्या मानवी भिन्नतेमध्ये जैविक आणि संस्कृतीची भूमिका दुहेरी प्रभाव स्पष्ट करते. "जीवशास्त्र आणि संस्कृती हे समान आहेत कारण ते निवड आणि अनुकूलन या उत्क्रांतीवादी तत्वांनी कार्य करतात. परंतु तरीही ते भिन्न आहेत कारण जैविकता मानवाला सार्वत्रिकतेकडे तर संस्कृती आपल्याला भिन्नतेकडे आणते.

संस्कृतीचे काही पैलू [कल्पना, मानदंड आणि वर्तन] चांगल्या अनुकूलनामुळे जिवंत राहतात तर इतर पैलू नाही. उदा., शहरे विकसीत का झाली ? काही भागातील लोक अन्नासाठी मासे का पकडतात ? xinca भाषा का नष्ट झाली ? हे सर्व प्रश्न सांस्कृतिक प्रेषणाबाबतचे आहेत. याचे उत्तर म्हणजे परिस्थितीजन्य घटकांचा भिन्न प्रभाव होय. [Segall et al, 1990, Berry et al., 2002] सामान्यतः याचा स्वीकार केला जातो की, काही जैविक पूर्वस्थिती (गुणवैशिष्ट्ये) / (सहजप्रवृत्ती) या जन्मापासून उपस्थित असतात. पण त्यांचे वर्तनातून प्रकट होणे हे कमी - अधिक प्रमाणात बाह्य जगातील परिस्थितीवर अवलंबून असते [परिस्थितीजन्य घटक]. याचप्रमाणे कल्पना, मानदंड आणि वर्तन हे सांस्कृतिक घटकातून निर्माण होते आणि ते चालू ठेवले जाते, लोक ते कसे व्यक्त करतात आणि कशाची निवड केली जाते हे परिस्थितीजन्य घटकावर अवलंबून राहील. यातील काही घटक निसर्गतःच काही संस्कृतीमध्ये उपस्थित असतात तर इतर मानव-

निर्मित असतात. ते एकतर कल्पना, मानदंड, वर्तन आणि गुणवैशिष्ट्ये यांना विरोध करतात किंवा उन्नत करतात. यामध्ये अनेक प्रकारच्या घटकांचा समावेश होतो.


* पर्यावरणीय परिवर्तके - हवामान प्रणाली, हवामान बदल, शिकारी [ निसर्गतः अवलंबून असणारे प्राणी], विकृती, कीटक, अन्नाची उपलब्धता. उदा. बिकट वातावरणामुळे प्रादेशिक वर्तन करण्याची सहजप्रवृत्ती थांबविली जाऊन प्रजातींकडून वर्तनात बदल केला जाईल.

* सामाजिक - राजकीय घटक - सरकारांमधील बदल, युद्ध, धार्मिक संघर्ष.
उदा., नवीन सरकारने समाजाला शारीरिक शिक्षेबाबत कमी सहिष्णु बनविण्यासाठी कायदा करणे.

* व्यक्तीगत - मानसशास्त्रीय घटक - कृती, मुल्ये आणि वैयक्तिक / समुहाचे व्यक्तीमत्व.
उदा., खेळ म्हणून प्राण्यांची शिकार करणे हे दबाव गटांमुळे आणि सामाजिक कार्यकर्ते [नेते] यांच्यामुळे बंद झाले आहे.

अशाप्रकारे सहजप्रवृत्ती [उदा., आक्रमकता] वर्तनातून कशी व्यक्त होते आणि काही कल्पना, मानदंड आणि वर्तन [go-karting, एक पत्निव्रत / पतिव्रत] विशिष्ट काळी आणि ठिकाणी कसे जीवंत राहतात आणि अनुकूलन केले जातात हे नैसर्गिक आणि राजकीय जगाच्या मिश्र परिस्थितीवर तसेच काही करिश्माई व्यक्ती किंवा समुहाच्या कृतींवर अवलंबून असते. Berry et al., (2002) यांनी हा प्रभाव त्यांच्या 'पर्यावरणीय - सांस्कृतिक प्रतिरुप' [eco-cultural model] मध्ये आकृतीरुपात स्पष्ट केला आहे.

यामध्ये सांस्कृतिक अनुकूलन आणि प्रेषण यांच्या संकीर्ण प्रक्रियेचे वर्णन केले आहे. हे प्रतिरूप अनेक मुख्य तत्वे आणि संकल्पनांनी चालते.




The eco-cultural model of cultural transmission

- अनुकूलन - संस्कृती आणि जीवशास्त्र हे दुहेरी प्रक्रियेमध्ये गुंतलेले आहे. त्यामुळे समूहातील सदस्य आणि त्यांचे भिन्न पर्यावरण यांच्यातील योग्यता / उचितता वाढते. ही प्रक्रिया संस्कृतीमध्ये भिन्नता तसेच भिन्न पर्यावरणाला टिकाऊ / सातत्यपूर्ण प्रतिक्रिया निर्माण करते. काही वर्तन आणि मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये ही बदलत्या वातावरणीय संदर्भाच्या अनुकूलनातून निवडली जातात. [Buss, 1989].

- द्वि दिशा - पर्यावरणीय - सांस्कृतिक प्रतिरूपाचे अनेक पैलू द्वि मार्गी आंतरक्रिया दर्शवितात, म्हणजेच ते

परस्परांवर प्रभाव पाडतात. पर्यावरणीय स्थिती सांस्कृतिक आणि जैविक अनुकूलनावर प्रभाव पाडते आणि प्रभावित होते. उदा., सामाजिक समूहाचा जगण्याचा मार्ग [शिकार, मासेमारी किंवा लाकूडतोड] हा पर्यावरणाद्वारे प्रभावित होतो. तसेच तो पर्यावरणीय परिस्थितीवर प्रभावदेखील पाडतात. [जंगलतोडीचा विचार करा].

दुसऱ्या द्विदिशा गतीशीलतेचे स्पष्टीकरण 'प्रतिभरण बाण A आणि B' करतात. वैयक्तिक आणि समूह कृती या पर्यावरणीय आणि सामाजिक - राजकीय परिस्थितीच्या प्रतिनिधी असू शकतात. [Berry et al., 2002]. दुसऱ्या शब्दात, हे प्रारूप सांस्कृतिक निर्धारणापासून परावृत्त करते. [cultural determinism] म्हणजे मानवी वर्तन हे प्रामुख्याने सांस्कृतिक घटकांनी आकार घेते. [Reber 1997]. हे प्रारूप मान्य करते की, व्यक्ती निष्क्रियपणे त्यांच्या संदर्भानुसार आकार घेत नाही. तर त्यांच्या निर्मितीमध्ये संदर्भाची भूमिका असते.

• प्रेषण [पुढे पाठविणे] -

मानवी वर्तनातून जीवशास्त्र, संस्कृती, पर्यावरण-शास्त्र आणि सामाजिक -राजकीय घटक व्यक्त होतात. आणि मानवी वर्तन हे पुरवणी संकल्पनांवर आधारीत आहे - आनुवंशिकता, सामाजिकीकरण, संस्कार आणि उत्कर्ष [संस्कृती बद्दल]. हे घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

1. आनुवंशिकता [Genetics] - आनुवंशिक माहिती (अनुकूलन मार्गाने वर्तन करण्याची गुणवैशिष्ट्ये) एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जैविक पालकांकडून पाठविली जाते. [याला अनुलंब (vertical) प्रेषण म्हणतात.

② सामाजिकीकरण [socialisation] –
मानदंड, मूल्ये, वर्तन आणि इतर मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये विविध प्रतिनिधींद्वारे पुढे पाठविले जातात. [उदा., कुटुंब, माध्यम, जोडीदार / सहकारी, चर्च] यांचे स्वरुप औपचारिक सूचनांसारखे असते. हे प्रेषण अनुलंब [जैविक पालक → मुले], क्षितिज समांतर [सहकारी ↔ सहकारी] तसेच तिरकस [माझ्या मित्राच्या वडिलांनी मला हे सांगितले] असते.

③ संस्कार [Enculturation] – सामाजिकीकरणाची हे कमी औपचारिक आहे. व्यक्तीने त्याच्या सांस्कृतिक समूहाकडून मानदंड, मूल्ये आणि वर्तन आत्मसात करणे/ शिकणे म्हणजे संस्कार होय. याचे प्रेषण सुद्धा अनुलंब, क्षितीज समांतर तसेच तिरकस होते.

④ उत्कर्ष [संस्कृतीमधील बदल] [Acculturation] –
हे सांस्कृतिक प्रेषण दुसऱ्या समूहाच्या संपर्काद्वारे होते. भिन्न सांस्कृतिक समूहातील लोकांशी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष आंतरक्रिया केल्याने (उदा. प्रवास, स्थलांतर, प्रसार माध्यमे] अभिवृत्ती आणि वर्तनामध्ये बदल होण्यास मदत होते. हे नाविन्यपूर्ण असू शकते आणि यातून नवीन मिश्र संस्कृतीचे प्रकार निर्माण होतात. तसेच ते ताणपूर्ण असू शकते. जेव्हा एका संस्कृतीतून दुसऱ्या संस्कृतीत व्यक्तीने स्थलांतर होते. [A/ – ISSA and Tousignant, 1997].

पर्यावरणीय – सांस्कृतिक प्रतिरुप परस्पर-विरोधी जैविक आणि सांस्कृतिक अनुकूलन दर्शविते. हे अनुकूलन नवीन पर्यावरण आणि इतर परिस्थितीजन्य परिवर्तकांना / घटकांना दिलेली प्रतिक्रिया असते. सांस्कृतिक आणि जैविक अनुकूलनाचा 'सुधारणा' समजणे हे विवादास्पद आहे. पर्यावरणीय - सांस्कृतिक प्रतिरुप व्यक्ती आणि त्याचे पर्यावरण, जैविकता आणि राजकीय संदर्भ यामधील

classmate
Date
Page

गतिशील संबंध सैद्धांतिक आणि चित्रात्मक पद्धतीने सादर करण्याचा प्रयत्न करते. हे प्रतिरूप जीवशास्त्र आणि संस्कृती [ जे परिस्थितीजन्य परिवर्तकांशी उत्क्रांतीवादी अनुकूलनाचे कार्य करतात.] यांच्या दुहेरी आणि अविभाज्य प्रभाव स्पष्ट करते. तसेच ते आपल्या वर्तनाचा आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीशी असणारे परस्पर प्रभावात्मक स्वरूप दर्शविते.

Limitations of the eco-cultural model-
पर्यावरणीय - सांस्कृतिक प्रतिरूपाच्या मर्यादा -

① हे प्रतिरूप वैयक्तिक भिन्नतेकडे दुर्लक्ष करते - हे प्रतिरूप मानवी वर्तन आणि मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये यांमधील सांस्कृतिक आणि जैविक अनुकूलन स्पष्ट करते. तरीही या प्रतिरूपाद्वारे सांस्कृतिक मानदंड उघडपणे स्वीकारण्यास अधिक इच्छा का दर्शवितात? याचे उत्तर मिळत नाही. अशा वैयक्तिक भिन्नतेचे स्पष्टीकरण वैयक्तिक पातळीवर करणे गरजेचे आहे. [ येथे अनुलंब पद्धतीने केले आहे.]

② काही सांस्कृतिक समूह इतरांपेक्षा विचलनास अधिक सहनशील असतात -
पर्यावरणीय - सांस्कृतिक प्रतिरूप सुचविते की, व्यक्तींच्या किंवा समूहांच्या कृती त्यांच्या सांस्कृतिक समूहाच्या मानदंड आणि मूल्यांवर प्रभाव पाडू शकतात. पण भिन्न सांस्कृतिक समूह त्यांच्या मानदंडाशी विविध प्रकारे विचलनास सहनशील का असतात? याचे पूर्ण स्पष्टीकरण या प्रतिरूपाद्वारे होत नाही. [ दुसऱ्या शब्दात म्हणजे, काही संस्कृती या इतरांपेक्षा नवीन परिस्थितीशी अनुकूलनास अधिक तयार का असतात?] यासाठी पुन्हा विविध / भिन्न समूहांच्या वैशिष्ट्यांचे अधिक विश्लेषण करणे गरजेचे आहे.

classmate
Date
Page

पर्यावरणीय -सांस्कृतिक प्रतिरूपाच्या या मर्यादा त्याच्या अनुलोब स्वरूपामुळे [top-down nature] निर्माण झाल्या आहेत.

1.6 culture and individual levels of analysis - विश्लेषणाची सांस्कृतिक आणि वैयक्तिक पातळी -

वर्तनाचे विश्लेषण करण्यासाठी सांस्कृतिक पातळीचा उपयोग ही जागतिक मानसशास्त्रातील संकल्पना विवादास्पद आहे. वर्तन विश्लेषणाची वैधता ही सांस्कृतिक पातळीवर की वैयक्तिक पातळीवर थांबोवती हा वाद फिरतो आहे [smith et al., 2006]. या दोन पातळ्या भिन्न कशा हे समजून घेणे महत्वाचे आहे. जागतिक संशोधनातील अनेक प्रकारचे मानसशास्त्रज्ञ नेहमी एक प्रश्न विचारतात की, संपूर्ण सांस्कृतिक समूह विशिष्ट वर्तनामध्ये एकमेकांपासून भिन्न कसे असतात? याऐवजी त्यांनी असे विचारले पाहिजे की, विशिष्ट घटकामध्ये व्यक्ती एकमेकांपासून भिन्न कशी असते? येथे ते संस्कृतीला एक वेगळा [स्वतंत्र] माहितीचा स्त्रोत समजतात. पण इतर मानसशास्त्रज्ञ व्यक्तीला एक वेगळा माहितीचा भाग समजतात, हाच विश्लेषणाच्या संस्कृती आणि वैयक्तिक पातळीवरील फरकाचा मुख्य मुद्दा आहे. Berry et al., (1992). यांच्या पर्यावरणीय-सांस्कृतिक प्रतिरूप संस्कृती पातळी विश्लेषणाला मान्यता देते. त्यामध्ये व्यक्तीचे वर्तन आणि मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये ही एका सांस्कृतिक समूहाच्या किंवा इतर सांस्कृतिक समूहाच्या सदस्यत्वानुसार बदलतात. उदा. एका संस्कृतीतील व्यक्ती दुसऱ्या संस्कृतीतील व्यक्तीपेक्षा एकाच परिस्थितीमध्ये भिन्न वर्तन करते कारण त्या दोन संस्कृतीमधील संस्कार आणि सामाजिकीकरणाचा तो प्रभाव करतो.

संस्कृती आणि वैयक्तिक विश्लेषणामधील फरक स्पष्ट करण्यासाठी एक उदाहरण घेता येईल. ज्यामध्ये दोन घटकांमधील संबंध अभ्यासला जातो ते दोन घटक म्हणजे संपत्ती आणि आनंद होय. संपत्तीमुळे आनंद मिळतो का ? हा प्रश्न विश्लेषणाच्या दोन पातळीवर स्पष्ट करता येईल. संस्कृती पातळीवर आपल्याला असा प्रश्न विचारता येईल की, अधिक संपत्ती असलेल्या सांस्कृतिक समूहातील लोक सामान्यतः कमी संपत्ती असलेल्या सांस्कृतिक समूहातील लोकांपेक्षा अधिक आनंद दर्शवितात का ? वैयक्तिक पातळीवर असा प्रश्न विचारता येईल की, अधिक संपत्ती असलेला व्यक्ती सामान्यतः कमी संपत्ती असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक आनंद दर्शवितात का ? जागतिक आणि विशेषतः आंतर - सांस्कृतिक मानसशास्त्र अनेकवेळा विश्लेषणाच्या संस्कृती पातळीवर कार्य करते.

संस्कृती पातळीवरील विश्लेषणातून असे निष्कर्ष मिळतात की, आपल्या विचार आणि वर्तनावर संदर्भिय घटकांच्या [ पर्यावरण, सामाजिक , सांस्कृतिक ] प्रभाव पडतो. याउलट वैयक्तिक पातळी विश्लेषणातून, अंतर्गत किंवा संदर्भहीन [ आनुवंशिक , व्यक्तीमत्व, माहिती - प्रक्रिया ] घटकांचा प्रभाव वर्तनावर पडतो. [ smith et al., 2006 ].

The reliability of culture - level analysis -
संस्कृती - पातळी विश्लेषणाची विश्वसनीयता -

व्यक्तीगत अनुभवातून असे दिसते की, काही लोक इतरांपेक्षा त्यांच्या संस्कृतीतील मानदंड आणि मूल्यांबाबत अधिक संवेदनशील असतात. याचे कारण म्हणजे सामाजिकीकरण आणि संस्काराचा होणारा प्रभाव होय. smith et al. (2006) यांनी संस्कृती - पातळी विश्लेषणाबाबत मते मांडली आहेत.

त्यांच्या मते, दोन परिवर्तकामध्ये संस्कृती - पातळीवर संबंध आहे. याचा अर्थ तो संबंध वैयक्तिक पातळीवर - देखील असेल असे गृहीत धरता येणार नाही. हे स्पष्ट करण्यासाठी, संपत्ती आणि आनंद यांच्यातील दुवा पुन्हा पाहता येईल. संस्कृती - पातळीवरील संशोधन हा संबंध असल्याचे सूचवितात. उच्च उत्पन्न देशातील प्रयुक्त उच्च पातळीचे व्यक्तीगत सुख - समाधान / आनंद दर्शवितात. [Diener et al., 1995] पण याच समान परिवर्तका संदर्भात एकाच संस्कृतीमधील समूहांमध्ये भिन्न निष्कर्ष मिळू शकतात.

विशेषत: श्रीमंत देशांमध्ये व्यक्तीगत संपत्ती हा आनंदासाठीचा निम्न सूचक आहे. [Oishi et al., 1999] याउलट घर - जीवन समाधान हा आनंदासोबत अधिक संबंधीत असणारा घटक आहे. या प्रकारचेच निष्कर्ष कार्य - समाधान आणि व्यक्तीगत अभिवृत्ती यांच्यातील संबंधाबाबत दिसून येतात. संस्कृती - पातळी विश्लेषण दर्शविते की, व्यक्तीगत [Individualistic] अभिवृत्ती देशातील प्रयुक्त अधिक कार्य - समाधान दर्शवितात. याउलट वैयक्तिक - पातळी विश्लेषण, दर्शविते की, समूहवादी अभिवृत्ती देशातील [Hong Kong] प्रयुक्त अधिक - कार्य समाधान दर्शवितात. [Hui et al., 1995]. ही सर्व उदाहरणे दर्शवितात की, समान परिवर्तका - बाबत संस्कृती - पातळी विश्लेषणाचे निष्कर्ष, वैयक्तिक - पातळी निष्कर्षांशी समानता दर्शवत नाहीत.